कृपया प्रसिद्धीसाठी

दि. १ जानेवारी २०१२

पुणे फिल्म फांऊडेशन व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे **१० वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०१२** दिनांक १२ ते १९ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. सिटी प्राईड (कोथरुड)- ३ स्क्रीन, आर डेक्कन (डेक्कन जिमखाना)- १ स्क्रीन, सिटी प्राईड अभिरुची (सिंहगड रोड)- २ स्क्रीन, ई-स्क्वेअर (पुणे विद्यापीठ मार्ग)- २ स्क्रीन, आयनॉक्स (कॅंप)- १ स्क्रीन व राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय (लॉ कॉलेज मार्ग)- १ स्क्रीन अशा एकूण ६ ठिकाणच्या १० स्क्रीन्सवर महोत्सवातील चित्रपट दाखविले जातील. महोत्सवाचा उद्घाटन सोहळा दिनांक १२ जानेवारी व समारोप सोहळा दि. १९ जानेवारी रोजी सिटी प्राईड-कोथरुड येथे पार पडेल. या महोत्सवासाठी भारतातून तसेच परदेशातून नामवंत आंतरराष्ट्रीय ज्युरी, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, कलावंत, तंत्रज्ञ, समीक्षक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. महोत्सवाच्या दररोजच्या माहितीसाठी डेलीबुलेटीन प्रसिध्द केले जाणार आहे.

यंदा ४३ देशातील सुमारे २०० हून अधिक चित्रपट या महोत्सवात दाखविले जाणार असून, दरवर्षीप्रमाणे यंदाच्या महोत्सवातही स्पर्धात्मक विभाग- जागतिक चित्रपट(ग्लोबल सिनेमा), मराठी चित्रपट व व्हिसलिंग वुडस् इंटरनॅशनल विद्यार्थी स्पर्धात्मक विभागात लाईव्ह ॲक्शन व ॲनिमेशन असा स्पर्धात्मक सहभाग असणार आहे.

दरवर्षी पुणे आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवच्यावतीने दोन नामवंत कलावंताना त्यांनी चित्रपट सृष्टीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल सन्मान केला जातो. या शिवाय संगीत व ध्वनी या क्षेत्रातल्या दिग्गजांना एस डी बर्मन यांच्या नावे दिल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय सन्मानाने गौरविले जाते. हे सन्मान महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात प्रदान केला जाईल.

महोत्सवास महाराष्ट्र शासन व त्यांचे सांस्कृतिक खाते, भारत सरकारचे माहिती व प्रसारण मंत्रालय, डायरेक्टोरेट ऑफ फिल्म फेस्टीव्हल-भारत सरकार, पुणे महानगरपालिका, राष्ट्रीय फिल्म संग्रहालय, फिल्म ॲन्ड टेलिव्हिजन इन्स्टीट्युट ऑफ इंडीया, मॅक्सम्युलर भवन, अलियांन्स दी फ्रान्से, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, एन एफ डी सी, फि ल्म डिव्हीजन, एअर इंडीया, इन्को आणि भारतातील विविध देशांचे दूतावास व इंटरनॅशनल फाऊंडेशन्स अशा अनेक संस्था सहकार्य करतात.
दरवर्षी प्रमाणे यंदाही महोत्सवात विविध विषयांवर चर्चासत्राचे आयोजन करण्यात येणार आहे.

**विजय तेंडुलकर मेमोरियल लेक्चर** अंतर्गत चित्रपट माध्यमावर आधारित महत्वाच्या व्यक्तींचे व्याख्यान होईल.

जागतिक स्पर्धात्मक चित्रपट विभागात १४ मराठी स्पर्धात्मक चित्रपट विभागात ७ व व्हिसलिंग वुड्स इंटरनॅशनल विद्यार्थी चित्रपट स्पर्धात्मक विभागात लाईव्ह ॲक्शन मध्ये १३ व ॲनीमेशनमध्ये ८ दाखविले जातील.

यंदा कंट्री फोकस जर्मनी असून, या देशातील ४७ चित्रपट या महोत्सवात दाखविले जातील. याशिवाय या महोत्सवात असणारे विविध विभाग पुढीलप्रमाणे-

- **जागतिक चित्रपट (ग्लोबल सिनेमा)**- अनेक देशांतील विविध भाषांचे तसेच विविध विषयांवर आधारित गेल्या दोन वर्षात निर्माण झालेले चित्रपट
- **कंट्री फोकस - जर्मनी**
  इंडो जर्मन राजनैतिक नातेसंबधांच्या हिरकमहोत्सवाच्या निम्मिताने या वर्षी ४७ चित्रपट दाखविण्यात येतील. यात जर्मन चित्रपट इतिहासातल्या महत्वाच्या टप्यातले खास चित्रपट असतील. विशेष म्हणजे जगप्रसिध्द दिग्दर्शक **Werner Herzog** आणि Wim Wenders यांच्या अविस्मरणीय चित्रपटांचा सहभाग यात असेल. यात Wim Wenders च्या '**Pina**' या ३ डी चित्रपटाचाही समावेश आहे.

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune



ORGANIZED BY
Pune Film Foundation
JOINTLY WITH
सत्यमेव जयते
Government of Maharashtra

- **रेट्रोस्पेक्टिव्ह –** यंदा जपान कॉन्सुलेट विद्यमाने नामवंत दिग्दर्शक Ozu आणि तैवानचे Hsiao - Hsien Hou एकाच दिग्दर्शक अथवा सिनेकलावंताचे विविध विषयांवरील चित्रपट.
- **इंडियन सिनेमा टुडे–** भारतातील प्रादेशिक भाषेत असलेले यावर्षीचे निवडक चित्रपट,
- **मराठी सिनेमा टुडे –** यंदाचे निवडक मराठी चित्रपट
- **अनुबोधपट –**चित्रपटसृष्टीतल्या दिग्गज कलावंतांच्या जीवनावर आधारीत फिल्म डिव्हिजन निर्मित बहुमोल अनुबोधपट.
- **ट्रिब्युट –** चित्रपट जगतातील दिवंगत कलावंताना श्रध्दांजली वाहणारे खास चित्रपट

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जागतिक व मराठी स्पर्धात्मक चित्रपट विभागात **महाराष्ट्र शासनातर्फे २० लाख रूपयांचे रोख पुरस्कार** दिले जातात.

१) महाराष्ट्र शासन 'प्रभात' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट – १० लाख
२) महाराष्ट्र शासन 'प्रभात' सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक – ५ लाख.
३) महाराष्ट्र शासन 'संत तुकाराम' सर्वोत्कृष्ट मराठी आंतरराष्ट्रीय चित्रपट – ५ लाख.
महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिले जाणारे पुरस्कार पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या वतीने नेमण्यात आलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ज्युरींच्या निर्णयानुसार प्रदान केले जातात.
तसेच **अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळातर्फे** सर्वोत्कृष्ट मराठी दिग्दर्शक, अभिनय, छायाचित्रण आणि पटकथा यासाठी प्रत्येकी रोख २५ हजार रूपये असे पुरस्कार दिले जातात.

४).**व्हिसलिंग वुड्स इंटरनॅशनल तर्फे विद्यार्थी स्पर्धात्मक चित्रपट** विभागात
लाईव्ह अ‍ॅक्शन सर्वोत्कृष्ट चित्रपट– $२००० , लाईव्ह अ‍ॅक्शन सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक– $१०००, लाईव्ह अ‍ॅक्शन सर्वोत्कृष्ट पटकथा– $१००० व सर्वोत्कृष्ट अ‍ॅनिमेशन चित्रपट– $१०००, ध्वनीमुद्रण $५०० व छायाचित्रण $५०० असे पुरस्कार दिले जातात.

५). **पिफ विशेष पुरस्कार:** फिल्म अ‍ॅंड टेलिव्हिजन इन्स्टिटयुटमधील यंदाच्या दिग्दर्शन विभागातल्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यास २५ हजार रुपये रोख असा पुरस्कार पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातर्फे दिला जातो. या सर्व पुरस्कारांचे वितरण १९ जानेवारी रोजी समारोप समारंभात सन्मानपूर्वक प्रदान केले जातील.
या महोत्सवात सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून, कॅटलॉग फी प्रत्येकी ५०० रुपये व विद्यार्थी, जेष्ठ नागरीक, सिनेकलावंत, फिल्मक्लब मेंबर यांना ३०० रुपये प्रमाणे देणाऱ्यास महोत्सवाची प्रवेशिका देण्याची व्यवस्था केली आहे.

महोत्सवाच्या अधिक माहिती संकेत स्थळ www.puneinternationalfilmfestival.com या वर उपलब्ध आहे.

**पी.आर. – प्रवीण प्र. वाळिंबे**
९८२२४ ५४२३४ / ९४०५० ३५४५८

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune